Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 75 – 77
DOI: 10.5281/zenodo.8338520
Original Research Article

# मराठवाडा मुक्तिसंग्राम : एक अभ्यास

जामकर अल्का रानबा

शिवाजी महाविद्यालय उदगीर ता. उदगीर जिल्हा: लातूर ४१३५१७ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: jamkaralka11@gmail.com

Received: 11 September, 2023 | Accepted: 13 September, 2023 | Published: 15 September, 2023

**महत्वाचे शब्द:** मराठवाडा मुक्ती संग्राम, निजामकालीन मराठवाडा, निजाम राजवट, रझाकार, मीर उस्मान अली खान, मराठवाडा मुक्तिदिन

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्याचा प्रादेशिक विभाग असलेला मराठवाडा प्राचीन काळापासून राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक उलाढालीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण विभाग राहिलेला आहे. प्राचीन काळापासून ते आधुनिक काळापर्यंत मराठवाड्याच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी अनेक साधने पहावयास मिळतात. त्यातूनच मराठवाड्यचे व्यक्तिमत्त्व अभ्यासणे सुलभ झाले आहे. कोणत्याही देशाचा नि समाजाचा अभ्यास करताना त्यासाठी आवश्यक माहितीचा पुरावा लागतो. तेव्हता ती ऐतिहासिक साधने त्या काळाचा इतिहास सांगणारी असतात. म्हणजेच लिखित, अलिखित साधनांवरून आपण त्या काळाची माहिती संकलित करीत असतो. तेव्हा शिलालेख उत्खनन अवशेष, ताम्रपट, नाणी, शिल्पावशेष व मूर्ती अवशेष, स्थापत्य अवशेष, किल्ले ही भौतिक तर वैदिक वाङ्मय, पुराणे, महाकाव्ये, बौद्ध वाङ्मय, जैन वाङ्मय यासारख्या लिखीत साधनांवरून आपणास त्या काळचा अभ्यास करता येतो. मराठवाड्याच्या इतिहासावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीने मराठवाड्यातील संशोधक व त्यांनी केलेले संश्ज्ञोधन बऱ्याच प्रमाणात उपयुक्त ठरते.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये

१. मराठवाड्याचा ऐतिहासिक अभ्यास करणे.
२. भारतातील विविध संस्थानांचा अभ्यास करणे.
३. निजामकालीन मराठवाड्याचा अभ्यास करणे.
४. मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा अभ्यास करणे.

## गृहितके

१. मराठवाडा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.
२. मराठवाडा मुक्तीसंग्रामातील अनेक संघटनांचे योगदान महत्त्वाचे आहे.
३. निजामाच्या जुलमी राजवटीचा अंत, अन्याय अत्याचाराचा अस्त आहे.
४. मराठवाडा मुक्तीसंग्रामात अनेकांचे बलिदान महत्त्वाचे आहे.

## मराठवाड्याचा मुक्तीसंग्राम

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तरी त्यावेळी संपूर्ण देश विविध संस्थानांमध्ये विखुरलेला होता. त्यावेळच्या ५६५ पैकी ५६२ संस्थांनाी स्वतंत्र भारतात सामील होण्याची सहमती दर्शविली आणि तशी कार्यवाही केली गेली. मात्र हैदराबाद संस्था, जम्मू काश्मीर आणि जुनागड संस्थान भारतात सामील झालेले नव्हते. त्या काळात मराठवाडा हा हैदराबाद संस्थानाचा भाग होता आणि मराठवाड्याच्या जनतेला स्वातंत्र्य मिळवण्यासाठभी हैदराबादच्या निजामाविरोधात दीर्घ लढा द्यावा लागला. तसेच अनेकांना या लढ्यात त्यांच्या जीवाचे बलिदान द्यावे लागले.

## निजाम मीर उस्मान अली खानचे राज्य

हैदराबाद संस्थानावर निजाम मीर उस्मान अलीखान याचे राज्य होते. हैदराबाद संस्थानावर तब्बल सहा पिढ्यापासून निजाम वंशाचे राज्य होते. निजामाच्या राज्यातून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण हैदराबाद मुक्तीसंग्राम सुरू झाला होता.

## जनतेवर अनन्वित अत्याचार

१९३८-१९४८ हा मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा प्रमुख कालखंड म्हणून ओळखला जातो. हैदराबाद संस्थानाची त्यावेळची लोकसंख्या १ कोटी ६० लाख होती. यात तेलंगणा, मराठवाडा, कर्नाटकचा काही भाग येत होता. मुक्मीसंग्राम सुरू झाल्यावर निजामाचा सेनापती कासीम रिझवी याने 'मजीलस-ए-इत्तेहादूल मुसलमीन' या संघटनेच्या माध्यमातून 'रझाकार' नावाने मुस्लीम स्वयंसेवकांची भरती केली आणि त्यांच्या मदतीने जनतेवर अनन्वित अत्याचार सुरू झाले.

## अनेकांचे अभूतपूर्व योगदान

मुक्तीसंग्रामाचे नेतृत्व स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चौहान, भाऊसाहेब वैशापायन, दिगंबरराव बिंदू, शंकरसिंग नाईक, विजयेंद्र काबरा तसेच इतर अनेक नेत्यांकडे होते. मराठवाड्याच्या प्रत्येक गावात हा लढा लढला गेला. यात जीवाची पर्वा न करता अनेक स्वातंन्त्र्यवीर पुढे आले. मराठवाड्यातील निजामाच्या पंतप्रधानास रोखण्यासाठी पुल उठवून देणारे काशीनाथ कुलकर्णी, मराठवाड्याची राणी लक्ष्मीबाई म्हणून प्रसिद्ध झालेल्या बदनापूर तालुक्यातील थोपटश्वर गावच्या दगडबाई शेळके, विठ्टलराव काटकर, बर्दापूर पोलीस ठाणे उडवून देणारे लातूरचे हरीश्चंद्रजी जाधव, परभणीत रझाकारांना हुकसावून लावणारे सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव अमनेश्वरकर, नांदेड येथील देवराव कवळे, जीवनराव बोधनकर, नळदुर्ग सर करणारे उस्मानाबाद येथील होटी गावचे व्होटीकर, जनार्दन गुरूजी आदींच्या रूपाने मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्य संग्राम तेजस्वीपणे लढला गेला.

## अनेकांना आले वीरमरण

या मुक्तीसंग्रामात श्रीधर वर्तक, जानकीलालजी राठी, शंकरराव जाधव, जालण्याचे जनार्धन मामा, किशनसिंग राजपुत, गोविंदरावजी पानसरे, बर्हिजी बापटीकर, राजाभाऊ वाकड, विश्वनाथ भिसे, जयंतराव पाटील आदी सारख्यांनी आपल्या जीवाची पर्वा केली नाही. या सर्व हुतात्म्यांनी आणि मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या संग्रामाचे मोल काढणे अशक्य आहे. यासीर जुबेर हैदराबादी मंत्री यांनी मुक्तीसेनेने ताब्यात घेतलेली जमीन परत घेण्याची प्रतिज्ञा केली. त्यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील जामेगाव माळावर निजामाच्या सैन्याला पुढे सरकू दिले नाही. यामध्ये मानसिंग राजपुत, लक्ष्मण आवचार, रामलाल राजपुत व रामचंद्र थडेदार हे आघाडीवर होते. यामध्ये रामचंद्र थडेवार हे बाळगीर मठ सरला येथे बंदुकीच्या गोळीने वेध घेतल्याने शहीद झाले. अशा प्रकारच्या अनेक क्रांतिकारकांनी मराठवाडा मुक्तीसंग्रामात वीरमरण पत्करल्याचे दिसून येते. मुक्तीसंग्रामाच्या लढ्यात निजामाच्या अन्याय अत्याचारी कारवायांना विरोध करण्यासाठी गांधीजींनी शस्त्रास संमती दिली तर गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेलांनी निजामविरोधी पोलीस ॲक्शनची घोषणा केली.

## मराठवाडा बनला भारताचा भाग

१३ सप्टेंबरला 'ऑपरेशन पोलो' अंतर्गत मेजर जनरल जे. एन. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली पाच दिशेने निजाम संस्थानावर कारवाई सुरू झाली. मुख्य फौजा सोलापूरकडून घुसल्या. पहाटे ४ वाजता ऑपरेशन सुरू झाल्यावर २ तासात नळदुर्ग व सायंकाळपर्यंत तुळजापूर परभणी ते मणिगढ, कनेरगाव, विजयवाड्याकडील बोनाकल पोलिसांनी ताब्यात घेतले. चाळीसगावकडून आलेल्या तुकडीने जालना शहर ताब्यात घेतले. चाळीसगावकडून आलेल्या तुकडीने कन्नड, दौलताबाद तर बुलढाण्याकडच्या तुकडीने जालना शहर ताब्यात घेतले. दुसरीकडे वरंगल, बीदर विमानतळावर भारतीय फौजांनी हल्ले केले. औरंगाबाद सर करून फौजा पुढे निघाल्या. भारतीय फैाजा पुढे रझाकार फार वेळ टिकू शकले नाहीत. निजामी सैन्य माघार घ्यायला लागले आणि कासीम रिझवीला अटक झाली. शेवटी त्याने शरणागती स्वीकारली आणि निजाम सरकारने हार मानली आणि हैदराबाद संस्थान भारतात निर्माण झाले आणि हैदराबाद संस्थानात तिरंगा फडकवला. १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा भारताचा एक भाग बनला. तेव्हापासून १७ सप्टेंबर १९४८ ला 'मराठवाडा मुक्तीदिन' साजरा केला जातो.

हैदराबाद विधानसभेत मराठवाड्यातील आमदारांनी केंद्र शासनपास हैदराबादचे विभाजन करण्यास भाग पाडले. तसेच मराठवाड्यासहीत स्वतंत्र तेलंगणा व स्वतंत्र विदर्भ राज्य निर्मितीचा डाव उधळून लावला. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या काळात मराठवाडा भाषिक आधारे महाराष्ट्रात सामील करण्यात आला. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी देखील मराठवाड्यातील जनतेने मोठे योगदान दिले. त्यानंतर १ मे १९६० ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली.

## संदर्भ सूची

१. मराठवाड्याचा इतिहास - विजय कोंडेकर
२. मराठवाड्याचा इतिहास - डॉ. अनिल कठारे
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम - डॉ. अनिल कठारे
४. मराठवाडा काल व आज - प्रा. भगवान काळे
५. हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा - अनंत भालेराव